दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ५० वा मंगळवार दि.२३ जुलै २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## फडणवीस साहेब, लक्षात ठेवा ; रोहित पवारांची पोस्ट चर्चेत



फडणवीस साहेब, हा महाराष्ट्र आहे, मध्यप्रदेश नाही. त्यामुळे तुमच्या पापाचा घडा हा स्वाभिमानी महाराष्ट्र फोडल्याशिवाय राहणार नाही, हे लक्षात ठेवा. अस लिहित रोहित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांचा ५२ सेकंदाचा व्हिडिओ शेअर केला आहे. रोहीत पवार : अहंकाराचा कळस... पुणे येथील बालेवाडीत भारतीय जनता पक्षाचे आज (दि.२१) विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी महाअधिवेशन सुरू आहे. यावेळी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. त्यातील ५२ सेकंदाचा व्हिडिओ शेअर करत रोहित पवारांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की,मा. फडणवीस साहेब, पब्लिकची मेमरी अत्यंत शॉर्ट असते, कारण आपण काल काय बोललो, हे आज लोकांना लक्षात राहत नाही, हे आपलं वक्तव्य म्हणजे अहंकाराचा कळस आहे. महाराष्ट्राच्या जनतेला अशा प्रकारे शॉर्ट मेमरी म्हणणे महाराष्ट्र खपवून घेणार नाही. एखाद्या योजनेचे १५०० रु दिले म्हणजे तुमच्या सरकारने केलेली पापं, भ्रष्टाचाराचे कारनामे, सत्तेची मस्ती, महाराष्ट्राच्या अस्मितेचे तोडलेले लचके आणि त्यातून महाराष्ट्राला झालेला मनस्ताप महाराष्ट्राचा शेतकरी, युवा, महाराष्ट्राची जनता विसरेल, असा तुमचा समज असेल तर मग महाराष्ट्र तुम्हाला अजून कळलेलाच दिसत नाही. निवडणुकीच्या तोंडावर योजना का आणल्या? हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानी जनतेला माहीत आहे. हा महाराष्ट्र आहे, मध्यप्रदेश नाही. त्यामुळे तुमच्या पापाचा घडा हा स्वाभिमानी महाराष्ट्र फोडल्याशिवाय राहणार नाही, हे लक्षात ठेवा. देवेंद्र फडणवीस : पब्लिक मेमरी शार्प असते... रोहित पवार यांनी आपल्या खात्यावर देवेंद्र फडणवीस यांचा ५२ सेकंदाचा व्हिडिओ शेअर केला आहे. त्यामध्ये देवेंद्र फडणवीस म्हणत आहेत, योजना या ठीकाणी आपण आणली आहे. आणि म्हणून तुम्हाला मला एवढच सांगायचं आहे, योजना अनेक आहेत.पण जोपर्यंत आम्ही रोज बोलणार नाही, आम्ही रोज सांगणार नाही, प्रत्येकाची तोंडी योजना असलीच पाहिजे. जो भेटेल तेव्हा, अगदी लोक वैतागलेत तरी चालतील, लग्नात गेले तरी लोकांना योजना म्हणजे काय सांगा. त्याच्यानंतर लग्न लावायला जावा.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत उदगीर येथील बौद्ध विहाराचे ३० जुलै रोजी होणार उद्घाटन




लातूर :- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत उदगीर येथील बौद्ध विहारचे उद्घाटन ३० जुलै रोजी होणार आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचना क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी येथे केल्या. राष्ट्रपती महोदया यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे बोलत होते. माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, भंन्ते पय्यानंद, भन्ते नागसेन बोधी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रपती महोदया यांच्यासह जिल्ह्यात येणाऱ्या सर्व मान्यवरांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने प्रत्येक विभागांचे अधिकारी, कर्मचारी यांनी प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळाला भेट देवून आवश्यक पूर्वतयारीचा आढावा घ्यावा. कोणत्याही परिस्थितीमध्ये यामध्ये कुचराई होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे ना. बनसोडे म्हणाले. या दौऱ्याच्या अनुषंगाने सर्व पूर्वतयारी विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. राष्ट्रपती महोदया यांचा दौरा लातूर जिल्ह्यासाठी ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण आहे. त्यामुळे या दौऱ्याची पूर्वतयारी योग्यप्रकारे करावी, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दौरा पूर्वतयारीच्या अनुषंगाने सूचना दिल्या. राष्ट्रपती महोदया यांच्यासह जिल्ह्यात येणाऱ्या विविध मान्यवरांच्या दौऱ्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पथकांच्या कामांचा यावेळी साविस्तर आढावा घेण्यात आला.

## बुद्ध विहाराच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू उदगीरला येणार

### मंत्री संजय बनसोडे यांची पत्रकार परिषदेत माहिती





लातूर : उदगीर येथे उभारण्यात आलेल्या भव्य-दिव्य अशा बुद्ध विहाराचे उद्घाटन देशाच्या राष्ट्रपती महामहिम द्रौपदीं मुर्मू यांच्या हस्ते होणार असून त्या ३० जुलै रोजी उदगीर येथे येत आहेत. त्यांच्या समवेत राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हेही उपस्थित राहणार असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी २२ जुलै रोजी लातूर येथे आयोजीत पत्रकार परिषदेत दिली. महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणाऱ्या बुद्ध विहार उद्घाटन सोहळ्यास राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन आदी उपस्थित राहणार असल्याचे ना. संजय बनसोडे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेवेळी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, भदंत उपगुप्त महाथेरो, भंते पय्यानंद थेरो आदि उपस्थित होते.

## शरद पवारांनी घेतली मुख्यमंत्री शिंदेंची भेट



मुंबई, : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख व खासदार शरद पवार यांनी आज (दि. २२) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सह्याद्री अतिथी गृहावर भेट घेतली. मराठा, ओबीसी आरक्षण आणि अन्य मुद्द्यावर दोघांमध्ये चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या भेटीत जलसंपदा, दुधाचे दर आणि साखर कारखान्यांचे काही प्रलंबित प्रश्न यासहित अनेक विषयांवर त्यांच्यात सखोल चर्चा झाल्याचे समजते.

## शरद पवारांची सत्ता आली की मराठा आरक्षण जाते



मराठा आरक्षणला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाठींबा आहे. मराठा आरक्षण हव असेल तर भाजपला सत्तेत आणा. भाजपाच्या काळात मराठा आरक्षण मिळाले; पण शरद पवार यांचे सरकार आले की मराठा आरक्षण जाते, असा टोला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लगावला. पुणे येथे भाजपच्या महाअधिवेशनात ते बोलत होते. शरद पवारांनी १० वर्षात काय केले? या वेळी अमित शहा म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० वर्षात देशाला खूप काही दिले आहे. शरद पवार यांनी देशाला १० वर्षात काय दिले? १० वर्षात शरद पवार यांनी काय केले याचा हिशोब द्यावा. शरद पवार यांना दहा वर्षांत जी विकास कामे करता आली नाहीत ती नरेंद्र मोदी यांनी दीड वर्षात केली.शरद पवार भ्रष्टाचारांचे सरदार शरद पवार हे भारतातील भ्रष्टाचारांचे सरदार आहेत. देशात शरद पवार यांनी भ्रष्टाचार रुजवला. त्याचबरोबर भ्रष्टाचाराला संस्थात्मक स्वरुप देण्याचे काम शरद पवार यांनी केले, अशी घणाघाती टीकाही त्यांनी केली. नरेंद्र मोदींचा मराठा आरक्षणाला पाठींबा मराठा आरक्षणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाठींबा आहे. मराठा आरक्षण हवं असेल तर भाजपला सत्तेत आणा. नरेंद्र मोदी यांनी आरक्षणाला बळ देण्याचे काम केले, भाजपाच्या काळात मराठा आरक्षण मिळाले.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरीकांच्या घेतल्या भेटी



लातुर / प्रतिनिधी : - राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. २२ जुलै रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन, त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार केला संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, कंधारचे नगराध्यक्ष अरविंद नळगे, लोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शरद पवार, कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बालाजी पंडागळे, बाळासाहेब पवार, सतीश देवकते, माजी उपमहापौर कैलास कांबळे, लातूर जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष प्रवीणकुमार बिरादार, मनोधर्य सेवाभावी संस्था लातूरचे अध्यक्ष पवनकुमार गायकवाड, उपाध्यक्ष सिराज शेख, प्रा. एकनाथ पाटील, प्रवीण सूर्यवंशी, व्ही. के आचार्य, शिरोळचे माजी सरपंच राजेश पाटील सूर्यवंशी, असलम चाऊस, संदिपान क्षीरसागर, अविनाश देशमुख, शैलेश भोसले, अनिल पवार, बब्रुवान पाटील, दशरथ सोमवंशी, फारुक शेख, युसुफ बाटलीवाला आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी,कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते. शुभ सोहळ्यास उपस्थित राहून दिल्या शुभेच्छा.

## दर्जी बोरगाव आणि गरसुळी येथे १ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते लोकार्पण संपन्न





लातूर/प्रतिनिधी :- रेणापूर तालुक्यातील दर्जी बोरगाव आणि गरसुळी येथे आमदार निधिसह विविध योजनांमधून मंजूर असलेल्या सुमारे एक कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोर्कापण व भूमिपूजन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते शनिवारी झाले. यावेळी श्री सदगुरू चिन्मयानंद स्वामी मंदीर परिसरात भक्त निवास बांधकाम करणे (२० लक्ष), श्री बाणाई मंदिरासमोर सिमेंट रस्ता करणे (५ लक्ष) या कामाचे भूमिपूजन आणि श्री चिन्मयानंद स्वामी मठ संस्थान परिसरातील पेव्हर ब्लॉक (७ लक्ष) व गॅबियन बंधारा बांधकाम (१० लक्ष) या कामाचे लोकार्पण झाले. यावेळी गव्हाण व ब्रह्मवाडी ग्रामस्थांचीही आमदार श्री. धिरज विलासरावजी देशमुख यांनी भेट घेतली. विविध विकास कामांचा संदर्भात ग्रामस्थांची चर्चा केली. गरसुळी येथे स्थानिक आमदार विकास निधीतून बांधलेला गावांतर्गत सिमेंट रस्ता (१० लक्ष), मुलभूत सुविधेंतर्गत स्मशानभूमी सिमेंट रस्ता (१० लक्ष), मनरेगा अंतर्गत सिमेंट रस्ता (१० लक्ष) या कामांचे लोकार्पण केले. तसेच, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत साठे वस्ती सिमेंट रस्ता (७ लक्ष) व सिमेंट नाली करणे (५ लक्ष), तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत गरसुळी तांडा येथे पेव्हर ब्लॉक रस्ता करणे (८ लक्ष), सिमेंट रस्ता करणे (५ लक्ष), सौर हायमास्ट बसविणे (५ लक्ष), सिमेंट रस्ता करणे (५ लक्ष) या कामांचे भूमिपूजन केले.

यावेळी माजी आमदार त्र्यंबक भिसे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, व्हा चेअरमन अनंतराव देशमुख, काँग्रेस रेणापूर तालुका अध्यक्ष जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, अनुप शेळके, काँग्रेस सेवादलाचे तालुकाध्यक्ष हनुमंत पवार, गटविकास अधिकारी सुमित जाधव, जिल्हा परिषदेच्या उप अभियंता उषा मोतीपवळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता देवशेटवार, विस्तार अधिकारी गोविंद काळे, विश्वास देशमुख, प्रभाकर केंद्रे, बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती अँड शेषराव हाके, बालासाहेब कातळे, सतीश पाटील, संचालक प्रकाश सूर्यवंशी, प्रवीण माने, नागनाथ कराड, विश्वनाथ कागले, बाळकृष्ण माने, अशोक राठोड, वामन जाधव, संजय माने, सुंदरराव माने, अमोल माने, ग्रामसेवक राठोड, पंचायत समितीच्या कनिष्ठ अभियंता ए व्ही उडते, गरसुळी सरपंच अजय राठोड, उपसरपंच भास्कर चव्हाण, आनंद कातळे, काशीराम पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## संपादकीय....

# उत्तर प्रदेश भाजपच्या हालचालींचे केंद्र

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) तिसर्यांदा सत्तेत आली आहे. तिसर्यांदा सत्तेत आल्यावर सरकारने कामाला सुरुवात केली. त्याचबरोबर दुसरीकडे भाजपमध्ये अंतर्गत राजकीय हालचालींना वेग आला आहे. या राजकीय हालचालींचे केंद्र उत्तर प्रदेश आहे, जिथे भाजपची सत्ता आहे. भाजपच्या या मोठ्या राजकीय हालचालींचे कारण म्हणजे पंतप्रधान मोदी यांच्यानंतर कोण? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर भाजपचे नेतृत्व कोणाकडे येणार, यावरून दोन बड्या चेहर्यांमध्ये चुरस आहे. यातील एक उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि दुसरे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आहेत; पण सध्याच्या राजकीय हालचालींमध्ये अमित शहा पडद्यासमोर नाहीत. उत्तर प्रदेशमध्ये पक्षात अंतर्गत लढाई सुरू आहे. यामध्ये एका टोकाला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ उभे आहेत, तर दुसर्या टोकाला उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य आहेत; मात्र वास्तव हे आहे की, मौर्य हे केवळ एक चेहरा आहेत. खरे तर पडद्यामागे सर्व डावपेच केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे चाणक्य अमित शहा करत आहेत. केशवप्रसाद मौर्य हे केवळ प्यादे असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. शहा स्वत: त्यांना पुढे करून योगींच्या 'मठा'मध्ये व्यत्यय निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अन्यथा योगी यांच्या तुलनेत केशवप्रसाद मौर्य यांची राजकीय उंची खूपच कमी आहे. योगी यांनी १९९८ मध्ये वयाच्या २६ व्या वर्षी पहिली लोकसभा निवडणूक जिंकली आणि त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. योगी यांना एकाही निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागलेले नाही. केशवप्रसाद मौर्य यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत आतापर्यंत केवळ दोनच निवडणुका जिंकल्या आहेत. एक २०१२ ची विधानसभा निवडणूक आणि दुसरी २०१४ ची लोकसभा निवडणूक. अशा स्थितीत कोणाच्याही भक्कम पाठिंब्याशिवाय योगी यांच्या विरोधात जाण्याची ताकद त्यांच्यात आहे, यावर विश्वास बसणे कठीण आहे. पंतप्रधान मोदी यांच्यानंतर भाजपच्या राजकारणात सर्वात मोठे स्थान कोणाचे आहे, याबाबत भाजप आणि संघाचा मोठा वर्ग योगी यांच्या मागे असल्याचे बोलले जात आहे. अनेक प्रादेशिक नेतेही दबक्या आवाजात शहा यांचे नाव घेतात. उत्तर प्रदेशातील भाजपमधील अंतर्गत लढाईचे हे प्रमुख कारण असल्याचे बोलले जात आहे. खरे तर, २०१७ मध्ये उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने सत्ता स्थापन केल्यावर तेव्हा शहा प्रभारी सरचिटणीस होते. यादव समाजाव्यतिरिक्त अन्य छोट्या जातींना भाजपशी जोडण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यानंतर २०१७ च्या निवडणुकीत भाजपचा उत्तर प्रदेशातील वनवास संपला. तेव्हापासून शहा यांना भाजपचे चाणक्य म्हटले जाऊ लागले. शहा यांचे चाणक्य धोरण भाजपमध्येच नव्हे, तर काँग्रेसमध्येही मानले जाऊ लागले. शहा यांना त्या राज्याच्या नेत्यापेक्षा उत्तर प्रदेश अधिक कळतो, असे सांगण्यापर्यंत काँग्रेसचे नेते गेले आहेत. यानंतर राज्यवार विधानसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवून शहा यांची प्रतिष्ठा वाढली. दरम्यान, उत्तर प्रदेशव्यतिरिक्त योगी यांची लोकप्रियता राष्ट्रीय स्तरावरही पसरू लागली. योगी यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशातील माफियांविरुद्धची मोहीम अन्य राज्यांसाठी उदाहरण बनू लागली. योगी यांची प्रशासनावरची पकड आणि गुन्हेगार, माफियांविरुद्धची बुलडोझर मोहीम इतकी प्रभावी झाली की, भाजपशासित अन्य राज्यांत त्याचे अनुकरण होऊ लागले. यासोबतच भगवा परिधान केलेले योगी यांचे हात कोणत्याही प्रकारच्या भ-ष्टाचारापासून निष्कलंक राहिले. परिणामी, योगी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने २०२२ मध्येही यश संपादन केले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत योगी यांच्या राजवटीत भाजपने उत्तर प्रदेशात ६२ जागा जिंकल्या होत्या; मात्र त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला केवळ ३३ जागा मिळाल्या आहेत. तेव्हापासून भाजपमध्ये योगी यांच्या विरोधात हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या पराभवाची समीक्षा हे केवळ निमित्त आहे. भाजपमध्ये पंतप्रधान मोदी यांचे निर्णय नेहमीच आश्चर्यकारक राहिले आहेत. त्यांनी एक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत ७५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकांना सरकारमधून काढून टाकले जात आहे. मोदी यांच्या या धोरणानुसार मुरली मनोहर जोशी, प्रकाश जावडेकर, थावरचंद गेहलोत या नेत्यांना सरकारमधून काढून संघटनात्मक कामात किंवा राज्यपालपदावर बसवले. पंतप्रधान मोदीही २०२५ मध्ये ७५ वर्षांचे होतील. त्यांची लोकप्रियताही पूर्वीसारखी राहिलेली नाही. या स्थितीत पंतप्रधानपदावर नवा चेहरा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०२७ मध्ये पंतप्रधान मोदी यांची राष्ट्रपतिपदासाठी निवड होणार असल्याची चर्चाही राजकीय वर्तुळात आहे. काहीही झाले, तरी उत्तर प्रदेशच्या राजकारणात योगी यांचा मठ अजूनही सुरक्षित आहे, ही एक गोष्ट स्पष्ट होते. भाजपच्या अंतर्गत लढाईला सामोरे जाण्याची क्षमता संघामध्ये आहे. नुकतेच संघप्रमुख मोहन भागवत यांनी एका वक्तव्यात भाजपमधील सुरू असलेल्या भांडणावर निशाणा साधला आहे. झारखंडमधील गुमला येथे भागवत यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केली आहे. प्रगतीचा अंत नसतो. माणसाला आधी सुपरमॅन, नंतर देवता आणि नंतर देव बनायचे असते; पण आता संपले असे समजू नये. त्यांनी सतत काम करत राहावे. कारण, विकासाला अंत नाही, असे भागवत म्हणाले होते. आगामी काळात संघ आणि भाजपची बैठक होणार आहे. त्यानंतर उत्तर प्रदेशच्या राजकारणात सपा-बसपाला टक्कर देण्यासाठी भाजपकडे दुसरा कोणताही मजबूत ओबीसी किंवा दलित चेहरा नाही, हे चित्र स्पष्ट होईल. अशा परिस्थितीत हिंदुत्व हे एकमेव शस्त्र आहे, ज्याच्या मदतीने राज्यातील राजकारण लढवता येते. त्यामुळे सध्या तरी योगी यांना भाजपकडे पर्याय दिसत नाही.

# युती असो या आघाडी मागासवर्गीयांची निधी चोरी

भारतात बहुरंगी बहुढंगी बहुराष्ट्रीय कंपन्या येतात आणि गोरगरिबांना ग्राहक बनवुन लुबाडणूक करून निघून जातात. जनतेला उल्लू बनविण्यासाठी प्रिंट मीडिया,चॅनल मीडिया प्रमुख भूमिका बजावत.कोणाला कुठे कधी मोठे बनवायचे आणि कोणाला कुठे झिरो बनवायचे हे ब्राम्हण बनिया ठरवितात. एखाद्या सिनेमा नाटक बनविणारी कंपनी काही लेखक, पटकथाकार,पात्र मानधन देऊन काम करण्यासाठी घेतात त्यांच्या कडून काम करून घेतात,एक हिरो असतो,एक व्हिलन असतो,एक सत्ताधारी असतो तर एक विरोधी पक्ष नेता असतो. ते जनतेला दाखवत असतात.लोकांना ते एकमेकांचे शत्रु वाटतात पण त्यांची सिनेमा नाटक कंपनी एकच असते.कंपनीचा फायदा होतो. सिनेमा नाटक बघनारे लोक मात्र लुबाडले जातात,बनवले जातात. त्याच प्रमाणे कॉंग्रेस,भाजपा,कम्यूनिस्ट,जनता दल हे एकमेकांचे शत्रु वाटत असले,तरी त्यांची कंपनी एकच आहे.या कंपनीचे नाव आहे, मनुवादी भटजी-शेटजी-लाटजी प्रा लि कंपनी. या कंपनीचे मुख्य उद्दिष्ट एक असते ८५ टक्के ब्राह्मणेत्तर बहुजन समाजाला लुबाडणे,फसविणे,गरीबाला आणखी गरीब बनविणे,त्यांची प्रगती होऊ न देणे.एकी होऊ न देणे हाच या कंपनीचा मुख्य धंदा होय.(संदर्भ प्रा मा म देशमुख) मागासवर्गीय अनुसूचित जाती जमाती यांच्या विकासासाठी तरतुद केलेला विकास निधी खर्च न करता राखीव ठेऊन तो दुसरीकडे वळविण्याचा करंटेपणा केवळ आघाडी सरकारनेच केला होता असा गळा फाडून बेंबीच्या देठा पासुन बोबलनारा ओरडनारा विरोधी पक्ष नेता देवेन्द्र फडणवीस आता मुख्यमंत्री असतांना तेच काम करीत होता म्हणजे युती असो या आघाडी मागासवर्गीयांची निधी चोरी हे होतच राहणार आहे काय?.आंध्रप्रदेशात मागासवर्गीया साठी बजेटमध्ये तरतुद केलेला निधी दुसरीकडे वापरता येत नाही.असा कायदा बनविण्यात आला.तसाच कायदा महाराष्ट्रात बनविण्यास काय हरकत आहे.आंध्रप्रदेशच्या मागासवर्गीया पेक्षा महाराष्ट्रातील मागासवर्गीय जास्त पुढारलेले आणि पुरोगामी वैचारिक वारसा सांगणारे आहेत. तरी त्यांच्यावर ही वेळ येते कारण हे मागासवर्गीय भाजप, शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी पक्षाचे वैचारिक गुलाम आहेत. तेच आंध्रप्रदेश मधील मागासवर्गीय विविध पक्षात असूनही ते समाजाकरीता नेहमी सभागृहात व रस्त्यावरील लढाईत सतत जागृत असतात.कारण ते वैचारिक दृष्ट्या जागृत मुक्त असतात.म्हणूनच त्यांच्या निधीला कोणी हात लावण्याची हिंमत करीत नाही.सरकार डाका टाकते तेव्हा आरक्षण लाभार्थी अधिकारी काय करतात,अधिकाऱ्यांना विचारात घेतल्या शिवाय सरकार कोणताही निर्णय घेत नसते,कारण शासनकर्ती जमात हे अधिकारी असतात,अधिकारी विषमतावादी विचारांच्या ट्रेंड युनियन चे समर्थक असतील तर ते सत्ताधारी राजकर्त्यांना सल्ला देत असतात, आणि ही निधी पळवा पळवी करतात.

भारत सर्वात मोठं सण म्हणजे दिवाळी.ती साजरी करतांना दुसऱ्याला भेट वस्तू देण्यात येतात.कामगारांना बोनस, बक्षिस. देण्यात येतात.पण माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मागासवर्गीय आदिवासींचे पैसे चोरून कर्जबाजारी शेतकऱ्यांना सन्मान करण्यासाठी वापरून एक नवीन पायंडा सुरु करुन गेला आहे. दि.१६ आक्टोबर २०१७ रोजी आदिवासी विकास विभाग व सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाने शासन निर्णय क्र बीयुडी-२०१७/ प्र क्र ०८ /कार्या-०६ व कृकमा ०७१७/प्र क्र १३८/२-स अन्वये आदिवासी उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याकरिता रु १००० कोटी निधी वर्ग केला होता.आदिवासी विभागाच्या शासन निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ या योजने अंतर्गत राज्यातील शेतकऱ्याचे कर्ज माफ करण्याकरिता आदिवासी विभागाने १००० कोटी निधी मंजूर करण्यात आला होता, त्यातील ५० टक्के इतका निधी म्हणजेच रु ५०० कोटी सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाने वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. म्हणजे हे सरासर मागासवर्गीय आदिवासींच्या बजेटची निधी सरळ सरळ चोरी करीत आले आहेत.तरी आमचे मागासवर्गीय लोकप्रतिनिधी व आरक्षणाचे लाभार्थी झोपेचे सोंग घेत आले आहेत. आंबेडकरी चळवळीतील बेरोजगार विचारवंत, लढाऊ नेते,कार्यकर्ते आपल्या लेटरहेड वर हाताने लिहुन निषेध नोंदविण्याची हिंमत दाखवीत आहेत. पण आदिवासी लोकप्रतिनिधी



नी आणि सामाजिक संघटना चालविणाऱ्या नेत्यांनी त्याविरोधात पाहिजे तेवढा निषेध सुद्धा नोंदविला नाही. काहीनी तालुका जिल्हा पातळीवर निषेध नोंदविला पण पुढे पाठ पुरवठा केला नाही.

अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत मार्च २०१७-१८ च्या बजेट अधिवेशनात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाला कुठलीच तरतूद केली गेली नव्हती, पण मागासवर्गीय आदिवासीचा पैसा वर्ग करण्याचाच अनुषंगाने सुधारित अंदाजात या विभागात ५०० कोटी ची तरतूद करण्यात आली. २०१७-१८ च्या अर्थ संकल्पात अनुसूचित जाती करिता ७२३० कोटी व अनुसूचित जमाती करिता ६५७४ कोटीची तरतूद करण्यात आली होती, वास्तविक पाहता रु ७७१८४ कोटी हा जो विकास योजनेचा निधी आहे त्याच्या ११.८ टक्के व ९.४ टक्के म्हणजेच रु ९१०८ कोटी व रु ७२५५ कोटी मागासवर्गीय आदिवासिंना उपलब्ध करून दिला पाहिजे होता, पण तस तर वित्त मंत्र्यांनी केलं नाहीचं. उलट केलेली तरतूद लाटण्याचे काम करुन पुढील सरकार साठी कुप्रसिद्ध आदर्श निर्माण करून ठेवला आहे. अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत राज्यस्तरीय योजने साठी रु ४५३१ कोटी आवनटीत करायला पाहिजे होते, त्या पैकी फक्त रु ३६०२ कोटी आवनटीत केलेत व त्याच्यातून रु ५०० कोटीचा डल्ला मुख्यमंत्री यांनी मारून पुढच्या राज्य सरकारसाठी पुरावा करून ठेवलाआहे.त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेऊन युती असो या आघाडी मागासवर्गीयांची निधी चोरी करत आहेत. म्हणूनच मी लिहतो की युती असो की आघाडी ह्या एस सी, एस टी, ओबीसी आदिवासी समाजाचा निधी चोरी करणारे एकच कंपनीचे आहेत हे सिद्ध होत आहे.मी फक्त २०१७ -२०१८ च्या निधी बाबत लिहले.२०१९ नंतर २०२४ पर्यन्त या सर्व निधीचा हिसब घेतला तर डोके फुटण्याची वेळ येईल.बजेट च्या निधी वर अभ्यास पूर्ण काम करणारे नेते कार्यकर्ते पुढे आले पाहिजे,काही लोक आहेत. ते बजेटवर जिद्दीने काम करतात. पण ते समाजसेवक म्हणून कचरा साफ करण्यावर जास्त लक्ष केंद्रित करीत असतील तर ही लढाई कोण लढेल हा मुख्य प्रश्न आहे.

मराठी माणसाच्या न्याय, हक्कासाठी गालावर मारण्याची भाषा बोलणारे राज ठाकरे विरोधी पक्ष नेता म्हणुन फडणवीसच्या चोरीच्या कृती वर हल्ला बोल का करीत नाही?. कारण त्याला मराठी बिराठीचे काही देणे घेणे नाही.तो ही त्याच कंपनीचा भागदारक आहे.जातीच्या रक्षणासाठी नेहमी सर्वच क्षेत्रातील भट ब्राम्हण एकत्र येतात,तेव्हा ते पक्ष,विचारधारा, विचारवंत,संपादक,पत्रकार सर्व बाजूने आपल्या माणसाची बाजु घेतात.मागासवर्गीय समाजाने या लोकांकडून काही तरी शिकले पाहिजे.अरे योग्य वेळी आपली जात दाखवुन सर्व समाजाच्या रक्षणासाठी एक दिवसा करीता एकत्र येऊन विरोध केला पाहिजे. त्यासाठी कायदा बनविण्यात आला पाहिजे यासाठी संघटीत होऊन सनदशीर मार्गाने संघर्ष केला पाहिजे. शेतकऱ्यांची कर्ज माफी झाली पाहिजे त्यासाठी वेगळी तरतूद सरकारने करावी, पण मागासवर्गीय आदिवासींच्या बजेटवर कुऱ्हाड मारू नये.हे बोलण्याची हिंमत एकही मागासवर्गीय नेत्या मध्ये का नाही.ज्यांचा पैसा आहे त्यांच्या साठीच वापरा. विकास महामंडळाची कर्ज माफ व्हावी म्हणून कित्येक वर्षाची मागासवर्गीय आदिवासीं सामाजाची मागणी प्रलंबित आहे, ती मान्य न करता उप योजनेचे पैसे वर्ग करणे, म्हणजे मागासवर्गीय समाजाच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे नाही काय?. तरी मागासर्गीय आदिवासी समाजाचा लोकप्रतिनिधी आणि संघटना नेता, कार्यकर्त्या, समाज पेटून उठत नाही. हीच खेदाची गोष्ट आहे.

मागासवर्गीय आदिवासी ज्या दिवशी वैचारिक दृष्ट्या जागा होईल.आपली राजकीय शक्ती दाखवेल तेव्हा तुम्हाला तुमची संपत्ती वाचविणे कठीण जाईल.सोशल मीडिया द्वारे आज सर्वच समाजात काही प्रमाणात जनजागृती होत आहे.हे नाकारून चालणार नाही. पेशवाई पुन्हा पुन्हा डोके वर काढत आहे.मागासवर्गीय,आदिवासी शेतकरी शेतमजूर यांनी राजकीयदृष्ट्या जागृत होऊन कायदा बनविण्यासाठी प्रयत्न करावा अन्यता असाच आपला हक्काचा निधी. युती असो या आघाडी मागासवर्गीयांची निधी चोरी करीत राहील.

सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९,भांडुप मुंबई.

# भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती!

आपल्या मातृभूमीची दुर्दशा पाहून जर तुमचे रक्त सळसळत नसेल तर ते रक्त नव्हे, पाणी आहे अगदी बालवयातच चंद्रशेखर आझाद यांच्यात देशभक्तीची भावना ओतप्रोत भरलेली होती. भारताच्या स्वातंत्र्यात त्यांचे अमुल्य योगदान आहे. क्रांतिकारकांचे स्मरण जेंव्हाही केले जाते तेंव्हा सर्वप्रथम चंद्रशेखर आझाद यांचे स्मरण होते. शक्तिशाली व्यक्तीमत्वांचा विचार मनात येताच सर्वप्रथम आपल्या डोळ्यांसमोर येते चंद्रशेखरजी आझाद यांचे व्यक्तिमत्व. रोचक माहिती वाचा, श्री कृ. गो. निकोडे- कृगोनि यांच्या शब्दशैलीत... संपादक.

चंद्रशेखरजी एक महान युवा क्रांतिकारी, ज्यांनी भारताच्या रक्षणाकरीता आपल्या प्राणांची आहुती दिली. आझाद आपल्या देशाचे वीर सुपुत्र होते, आपल्या पराक्रमाची आणि शौर्याची गाथा त्यांनी स्वतः लिहिली आहे.

आओ झुक कर सलाम करे उनको,<br>
जिनके हिस्से में ये मुकाम आता है!<br>
खुशनसीब होते है वो लोग,<br>
जिनका लहू इस देश के काम आता है!!

चंद्रशेखर आझाद यांचा जन्म दि.२३ जुलै १९०६ रोजी मध्यप्रदेशातील भाभरा गावी झाला. चंद्रशेखर सिताराम तिवारी असे त्यांचे मूळ नाव होते. त्यांचे वडील अत्यंत प्रामाणिक, स्वाभिमानी आणि दयाळू वृत्तीचे होते. दुष्काळ पडल्याने आपले बदरका हे मूळ गाव सोडून आपल्या कुटुंबासह ते भाभरा या गावी स्थायिक झाले. भिल्ल वस्तीत त्यांचे बालपण गेल्याने त्या मुलांसारखे त्यांना देखील धनुष्यबाण उत्तम रीतीने चालवता येऊ लागले. बालपणापासून विद्रोही स्वभावामुळे त्यांचे मन काही अभ्यासात रमले नाही. खेळणे मात्र त्यांना फार आवडे. त्यांना आणि त्यांचा भाऊ सुखदेवला शिकविण्यासाठी त्यांच्या वडिलांचे मित्र मनोहरलाल त्रिवेदी घरी येत असत. त्यांच्या आईला त्यांना संस्कृतचा विद्वान बनविण्याची इच्छा होती, त्यामुळे त्यांना संस्कृत शिकण्यासाठी वाराणसी येथील काशी विद्यापीठात पाठविण्यात आले.

महात्मा गांधीजींच्या असहकार आंदोलनात आझाद यांचा खुप मोठा सहभाग राहिला होता. गांधीजींनी सन १९२१ साली असहकार आंदोलनाची घोषणा केली. त्यावेळी चंद्रशेखरजी केवळ पंधरा वर्षांचे होते. अगदी तेंव्हापासून त्यांच्यात देशभक्तीची भावना उचंबळत असल्याने ते गांधीजींच्या असहकार आंदोलनात सहभागी झाले. परिणामी त्यांना कैद करण्यात आले. न्यायालयात न्यायाधीशांनी नाव विचारल्यावर त्यांनी आझाद असे सांगितले, वडीलांचे नाव स्वतंत्र आणि निवासस्थान तुरुंग सांगितले होते. आझादच्या उत्तराने न्यायाधीश संतापले आणि त्यांनी पंधरा फटक्यांची शिक्षा सुनावली. आपल्या निश्चयावर ठाम राहणाऱ्या आझादने शिक्षा सहन केली. प्रत्येक फटक्यानिशी भारत माता की जय! असा नारा दिला. या घटनेनंतर चंद्रशेखर तिवारी हे आझाद नावाने प्रसिद्ध झाले.

त्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील कार्यकर्तृत्वाचा महत्वपूर्ण उल्लेख इतिहासात आढळतो. सन १९२२ साली गांधीजींनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना फार वाईट वाटले. त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वतंत्र करण्याची शपथ घेतली. पुढे त्यांची भेट हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली. ही एक क्रांतिकारी संस्था होती, यात सर्वांचा अधिकार समान होता आणि कुणाशीही भेदभाव केला जात नव्हता. या गोष्टीमुळे आझाद फार प्रभावित झाले. त्यांच्या नेतृत्वात या संस्थेनी इंग्रजांच्या तिजोऱ्या लुटून संस्थेकरीता निधी गोळा केला. सन १९२५ साली त्यांनी तडीस नेलेल्या काकोरी कांडाची इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद झाली आहे. संस्थेच्या एकूण दहा सदस्यांनी इंग्रजांचा खजिना जात असलेल्या काकोरी ट्रेनला लुटून इंग्रजांपुढे तगडे आव्हान उभे केले होते. काकोरी प्रकरणात चंद्रशेखर आझाद यांचा महत्वपूर्ण वाटा आहे. याशिवाय महान क्रांतिकारी रामप्रसाद बिस्मिल, अशफाक उल्ला खां, राजेंद्र नाथ लाहिडी तथा ठाकूर रोशन सिंह यांना या प्रकरणात फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती.



चंद्रशेखर आझाद यांच्यापुढे पुन्हा नव्याने संस्थेला उभारी देण्याचे आव्हान उभे राहिले. ओजस्वी, विद्रोही आणि तापट स्वभावाचे चंद्रशेखर आझाद इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन दिल्लीला निघून गेले. त्याठिकाणी त्यांनी क्रांतीकारकांची एक सभा आयोजित केली. तेथे त्यांची भेट भगतसिंग यांच्याशी झाली. हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनने पुन्हा एकदा क्रांतिकारी आणि गुन्हेगारी मार्गांचा अवलंब केल्याने इंग्रज चंद्रशेखर आझाद यांच्या मागावर होते. आझाद यांनी लाला लजपत राय यांच्या हत्येचा सूड घेण्यासाठी सन १९२८ साली सॉन्डर्सची हत्या केली. चंद्रशेखर आझाद म्हणायचे, की संघर्षाच्या मार्गावर हिंसा ही मोठी गोष्ट नाही! पुढे इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली. भगत सिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडवण्यासाठी देखील आझाद यांनी खुप प्रयत्न केलेत, परंतु इंग्रजांच्या सैन्य बलापुढे त्यांचा नाईलाज झाला. नेहमीप्रमाणे इंग्रजांना चकमा देण्यात ते यावेळीही यशस्वी ठरले. चंद्रशेखरजी म्हणायचे, की ते आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत देशासाठी शत्रूशी लढत राहतील. मरेपर्यंत इंग्रजांच्या हाती न लागण्याची त्यांनी शपथ घेतली होती, ती त्यांनी पाळली. ते आपल्या नावाप्रमाणे शेवटपर्यंत आझाद राहिले आणि देशाकरता प्राणाची आहुती दिली. चंद्रशेखरजी आझाद हे एक महान क्रांतिकारी होते. आपल्यातील देशभक्तीची भावना व अद्वितीय साहसाने त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. त्यांनी अनेक लोकांना या आंदोलनात सहभागी होण्याकरता प्रेरित केले. मातृभूमीच्या या महान सुपुत्राने आपल्यातील शौर्याच्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि वाइसरायच्या ट्रेनला उडवण्याचा देखील प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर महान क्रांतिकारी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी सॉन्डर्स या इंग्रज अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्या. शिवाय भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्यासमवेत हिंदुस्तान समाजवादी प्रजातंत्र सभेची स्थापना केली. चंद्रशेखर आझाद हे भगतसिंगचे सल्लागार होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली.

इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली होती. दुसरीकडे चंद्रशेखर आझाद ही शिक्षा कमी करून जन्मठेप व्हावी, यासाठी खुप प्रयत्न करत ते अलाहाबादला आले होते. परंतु याचा सुगावा इंग्रजांना लागल्याने त्यांनी अल्फ्रेड पार्कमध्ये चारी बाजूंनी त्यांना घेरले. दोन्ही बाजूंनी चकमक आणि गोळीबार सुरु झाला, एक क्षण असा आला की आझादांच्या बंदुकीत केवळ एक गोळी उरली होती. त्यांना परिस्थितीचा अंदाज आला होता, त्यामुळे इंग्रजांच्या हातून मरण्यापेक्षा त्यांनी स्वतःवर गोळी झाडणे पसंत केले. अशा प्रकारे दि.२७ फेब्रुवारी १९३१ रोजी भारतमातेचा वीर सुपुत्र अमर झाला आणि त्यांची अमरगाथा इतिहासाच्या पानांमध्ये सुवर्णाक्षरांनी कोरल्या गेली.

!! जयंती निमित्त या महान क्रांतीकारकाला दंडवत प्रणाम !!

******

कृगोनि- कृ. गो.<br>
निकोडे, से.नि.प्राथ.शिक्षक.<br>
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक,<br>
रामनगर-गडचिरोली, ७७७५०४१०८६.


# शेतकऱ्यांना कुबड्या नको, स्वातंत्र्य द्या!

'शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे की कमकुवत?' हा रमेश पाध्ये यांचा लेख (लोकसत्ता विचारमंच- १२ जुलै) वाचला. हा लेख पटण्याजोगा नाही कारण त्यातील मांडणी वाचकांची दिशाभूल करणारी आहे. हा लेख प्रामुख्याने किमान आधारभूत किमती व त्यात झालेल्या 'अवास्तव' वाढीवर बेतलेला आहे. आधारभूत किमतीच्या कुबड्या काढल्या तर शेतकरी सक्षम कसा होईल या बाबतीत मात्र ते काही बोलत नाहीत. मी शेतकरी संघटनेचा अध्यक्ष होतो, तसेच मोदी सरकारने २०२० साली पारित केलेल्या तीन कृषी कायद्यांना स्थगिती दिल्यानंतर, कायद्यामध्ये दुरुस्त्या करून शिफारशी करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या तीन सदस्यांच्या समितीत मी एक सदस्य होतो. शेतकरी संघटनेने किमान आधारभूत किमतीचे (एमएसपी) समर्थन कधीचे केलेले नाही तसेच एमएसपीचा कायदा व्हावा या मागणीला कडाडून विरोध केला आहे. इतकेच काय, शरद जोशींनी कृषी मूल्य आयोग बरखास्त करा अशी मागणी केलेली आहे. हरीतक्रांतीनंतर कृषीमूल्य आयोगाची स्थापन करण्यात आली मात्र किमान आधारभूत किंमत ठरवताना ती शेतीमालाच्या उत्पादन खर्चावर न ठरवता जागतिक बाजार, मागणी- पुरवठा स्थिती, राजकीय परिस्थिती, निवडणुका वगैरे लक्षात घेऊन ठरवली जाते असे, असे ते म्हणतात व ते खरे आहे. याचा अर्थ ती उत्पादन खर्चावर आधारित नसे. पाध्ये यांच्या म्हणण्यानुसार १९८० मध्ये शरद जोशींनी सरकारवर दबाव टाकून आधारभूत किमती वाढवण्यास सुरुवात केली. शरद जोशींनी 'उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव' मागितला यात काय चूक झाली? त्याकाळी शेतकऱ्यांना येणारे अनेक खर्च हिशोबत धरले जात नसत किंवा अगदीच कमी धरले जात. शेणखताची बैलगाडी खर्चात धरताना ३/- रुपये प्रती गाडी व दूध उत्पादकांच्या उत्पन्नाच्या हिशोबत शेणखताची बैलगाडी ३०/- रुपयाला धरली जात असे. शेतकऱ्याला खते घेण्यासाठी प्रवास खर्च लागत नाही माल बाजारात न्यायला खर्च येत नाही हे कसे? त्या काळी तर फक्त तालुक्याच्या गावालाच खताची दुकाने असत व बाजार समित्या आज ही तालुक्याच्या गावीच आहेत. शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्ती शेतात कष्ट करतात त्याची मजुरी धरली जात नसे. वीजबिल तर आज ही धरले जात नाही हे हिशेबत धरायला नको? औद्योगिक वस्तूंची किंमत ठरवताना कारखानदार हे सगळे खर्च हिशोबात धरतोच ना? सीमांत शेतकऱ्याच्या शिवारात त्याच्या कुटुंबाला पुरेसे धान्य पिकत नाही, असे म्हटले आहे. सीमांत शेतकऱ्यांची व्याख्या म्हणजे पाच एकर ते अडीच एकर शेत जमिनीचा मालक अशी आहे.

# कॅन्सरग्रस्तांसाठी आता नव संजीवनी जीएमपी मॉड्यूलर युनिटने सुपर-स्पेशलाइज्ड कॅन्सर क्लिनिक ठाण्यात

**प्रसिद्ध वैद्यकीय कर्करोगतज्ञ प्रो. डॉ. विजय पाटील व ऑन्कोलॉजिस्ट डॉ. आशय कर्पे यांच्या नेतृत्वाखाली सुसज्ज भारतातील पहिले अत्याधुनिक क्लिनिक**



ठाणे(फिरदोस मुकादम) : जीवघेणा मानल्या जाणाऱ्या कॅन्सर आजारावर आता अत्याधुनिक सुविधांसह तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने मात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रसिद्ध कर्करोगतज्ञ प्रो. डॉ. विजय पाटील व ऑन्कोलॉजिस्ट डॉ. आशय कर्पे यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यात जीएमपी मॉड्यूलर युनिटने सुपर-स्पेशलाइज्ड कॅन्सर क्लिनिक करण्यात आले आहे. कॅन्सर इन्स्टिट्यूट याच्या माध्यमातून आता कॅन्सलग्रस्तांना नव संजीवनी मिळाली आहे.भारतातील पहिल्या या अत्याधुनिक क्लिनिकचे उद्घाटन सिनेअभिनेत्री आणि संघर्ष योध्दा महिमा चौधरी च्या हस्ते करण्यात आले आहे. याच्या माध्यमातून आता अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण पद्धतीतून आता आंतरराष्ट्रीय खर्चाच्या काही अंशांमध्ये भारतात उपचार उपलब्ध आहेत. सुश्री महिमा चौधरी (अभिनेता आणि कर्करोग वाचलेल्या) यांनी कॅन्सर इन्स्टिट्यूटचे उद्घाटन केले मॉड्यूलर युनिटने सुसज्ज असलेल्या सुपर-स्पेशलाइज्ड कॅन्सर क्लिनिकच्या भारतातील पहिल्या शृंखला (प्रसिद्ध वैद्यकीय कर्करोगतज्ज्ञ आणि प्रोफेसर डॉ. विजय पाटील आणि सहकारी ऑन्कोलॉजिस्ट डॉ. आशय कर्पे यांच्या नेतृत्वाखाली ) २० जुलै, २०२४ रोजी ठाणे (मुंबई महानगर प्रदेश) येथील टायटेन मेडिसिटी हॉस्पिटलच्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावर सुरू झाले आहे. नवीन उपचार पद्धती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने कॅन्सरवर आता सहज पद्धतीने उपचार करण्याची संधी उपलब्ध झाली आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. विजय पाटील यांनी दिली. ठाण्यातील पहिल्या कॅन्सर इन्स्टिट्यूट बद्दल त्यांनी सविस्तर पद्धतीने माहिती दिली आहे. कॅन्सर इन्स्टिट्यूट नाविन्यपूर्ण संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, क्रांतिकारी उपचारपद्धती आणि वैयक्तिक रूग्ण काळजी याद्वारे भारतातील कर्करोगावरील उपचार प्रगत करण्यासाठी वचनबद्ध आहे. (लोजेनिक) ऑफर करण्याव्यतिरिक्त, (ऑटोलॉगस), स्टेम सेल / बोन मॅरो ट्रान्सप्लांट, गामा डेल्टा टी-सेल्स, जीन थेरपी ( आणि जीन एडिटिंग), इम्युनोथेरपी, प्रगत / गहन केमोथेरपी केली जात आहे.

देशात पहिले; उपचारात क्रांती :
सुप्रसिद्ध कर्करोग तज्ञ डॉ. विजय पाटील आणि सहकरी ऑन्कोलॉजिस्ट डॉ. आशय कर्पे यांच्या नेतृत्वाखाली सुसज्ञ पद्धतीचे क्लिनिक सुरू केले आहे. या ठिकाणी अत्याधुनिक लोजेनिक सेल थेरपी दिली जात आहे. अशा प्रकारचे उपचार पद्धती देणारे हे क्लिनिक म्हणजे देशातील पहिले आणि एकमेव आहे. या क्लिनिकच्या माध्यमातून आता विजय पाटील आणि आशय कर्पे यांनी नवी क्रांती घडवून आणली आहे. कर्करोगाच्या उपचारात जगभरात लहरी निर्माण करणारे क्रांतिकारी नवीन तंत्रज्ञान. यामध्ये दात्याच्या पेशींचा समावेश होतो, सॉलिड-स्टेट ट्यूमर (ज्यामध्ये जवळपास ९९% कॅन्सर प्रकरणे आढळून येतात) साठी उपचाराची शेवटची ओळ म्हणून प्रशासित केले जाऊ शकते आणि सध्या प्रचलित ऑटोलॉगस पासून उपचाराचा कालावधी सहा आठवड्यांपर्यंत कमी केला जातो. टी सेल थेरपी जी बहुतेक फक्त रक्त कर्करोगासाठी (लिक्विड स्टेट ट्यूमर) प्रभावी आहे, जी सर्व कर्करोगाच्या प्रकरणांपैकी फक्त १% आहे. उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या सुश्री महिमा चौधरी, अभिनेत्री आणि कर्करोग पीडित यांच्या हस्ते फित कापून आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर सुविधेचा मार्गदर्शित दौरा करण्यात आला, जिथे बॉलीवूड स्टारने कर्करोग रुग्ण आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

डॉ. विजय पाटील आणि टीमवर कौतुकाचा वर्षाव मेळाव्यात महिमा चौधरीने उद्घाटन करताना डॉक्टर विजय पाटील आणि त्यांच्या टीमचे खास कौतुक केले तसेच नव्या उपचार पद्धतीने कॅन्सरवर मात करण्यासाठी सुसज्ञ झालेल्या क्लिनिक ची माहिती दिली. आज कॅन्सरच्या उपचारात झालेली प्रगती पाहून आश्चर्य वाटले आणि आता या भयंकर आजारापासून अनेक जीव वाचवले जाऊ शकतात हे जाणून खूप आनंद झाला. आज मला येथे आमंत्रित केल्याबद्दल आणि या महान कार्यासाठी मला माझे योगदान दिल्याबद्दल मी चांगल्या डॉक्टरांचा आभारी आहे. मला असे वाटते की हे डॉक्टर आपल्याला जे दैवी आणि निःस्वार्थ सेवे देतात त्या तुलनेत ते काहीच नाही. मी येथील सर्व प्राध्यापक, परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांचे देखील अभिनंदन करते, की ते ही सुविधा उभारण्यात आणि चालवण्यामध्ये जे प्रचंड काम करत आहेत – भारतातील अशा प्रकारची पहिलीच कौतुकास्पद कार्यपद्धती आहे. आपण सर्व मिळून कर्करोगाविरुद्धची लढाई जिंकू, अशा शब्दात महिमा चौधरी यांनी कौतुकाचा वर्षाव केला.

भारतात प्रथमच लोजेनिक सेल थेरपी प्रक्रिया यशस्वी :
चे संस्थापक, अग्रगण्य वैद्यकीय ऑन्कोलॉजिस्ट, प्राध्यापक आणि लेखक डॉ. विजय पाटील यांनी आपल्या नव्या मोहिमेबद्दल माहिती दिली. अमेरिकेतील या रोगाचे पृथ्वीच्या दर्शनी भागातून समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट राहिले आहे आणि या क्लिनिकच्या माध्यमातून आम्ही या मोहिमेत सहभागी झालो आहोत. अत्याधुनिक आणि नाविन्यपूर्ण उपचार पद्धतीमुळे आता भारतात प्रथमच लोजेनिक सेल थेरपी प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करू शकलो आहोत, जिथे काही रुग्णांमध्ये रक्तदात्याच्या टी-सेल्स (कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य आणि नष्ट करण्यासाठी सुधारित) समाविष्ट करण्यात आले. पाश्चिमात्य देशांतील खर्चाच्या १/८व्या भागावर घन स्थितीतील गाठी आहेत. यामुळे अनेकांचे जीव वाचतील. त्यामुळे ही मोहीम आमच्यासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

# या देशातील कोणतेही राजकीय पक्ष आमच्या स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा देत नाहीत. तरी संघटनेनेच राजकीय शक्ती प्राप्त होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ५६ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.**



छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, २१ जुलै १९४६ ला पुणे येथील सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, या देशातील कोणतेही राजकीय पक्ष आमच्या स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा देत नाहीत. तसेच २१ जुलै १९५० ला संघटनेनेच राजकीय शक्ती प्राप्त होणार आहे. असे औरंगाबाद येथे म्हटले होते. या दोन्ही विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (–खछ– : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ५६ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे १४ जुलै २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रा. मंगला झिने मॅडम म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड सत्याग्रह, काळाराम मंदीर व इतर अनेक लढे दिलेत ज्याला कुठल्याही राजकीय पक्षाने पाठिंबा दिला नाही. तरी त्यांनी समतेचा लढा सुरूच ठेवला ही उच्चवर्णियांना चपराकच होती. म्हणून संघटनेच्या माध्यमातून लोक जागृत होतील आणि ही जागृत झालेली माणसे एकत्र आली तर लढ्याला व्यापक स्वरूप प्राप्त होईल. या अनुषंगानेच राजकीय शक्ती प्राप्त होणार असे बाबासाहेब म्हणाले होते.

याप्रसंगी संघराज धम्मकिर्ती म्हणाले की, भारताचे संविधान निर्मिती पूर्वीचे आणि नंतरचे बाबासाहेब समजून घेतले पाहिजे. राजकीय सत्ता स्थापन करण्यासाठी विशिष्ट ध्येय उराशी बाळगले पाहिजे. येथील प्रस्थापित आम्हाला नाकारत असल्याने धार्मिकतेच्या माध्यमातून मिसनरी कार्यकर्ते निर्माण करून त्यांच्या सहकार्याने क्रांती घडवून आणली पाहिजे. धम्माचे प्रशिक्षण नसल्याने वाताहात होत आहे. काँग्रेसने अनेक विचारवंतांना आपल्या गळाला लावले आहे. नुसता आंबेडकर नावाचा जप करने सुरू आहे. विचारांच्या आचरणाचे काय झाले? बुद्धी, वेळ आणि पैसा देणारी माणसे कुठे आहेत? अशोक नरवडे म्हणाले की, जी निमंत्रित माणसे आली नाहीत त्यांना पुन्हा निमंत्रित करू नये. गोविंद कांबळे म्हणाले की, त्रिशरण, पंचशील, अष्टांगिक मार्ग,दहा पारमिता च्या माध्यमातून मैत्रीभाव स्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एस. ओ. इंगळे म्हणाले की, येतांना टिप्पणासह तयारी करून आले पाहिजे. आपण एकाच बोटीतील प्रवासी असल्याने आपल्या सर्वांच्या भावना सारख्याच आहेत. आपल्या समाजाची दिशाच बदलविण्यात आली आहे. सामान्य जनतेला स्वातंत्र्य या कल्पनेची जाणीवच नाही. शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ उरत नाही. जोपर्यंत जातीयता नष्ट होत नाही तोपर्यंत लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही. संघर्षाने शक्ती प्राप्त होईल पण त्यासाठी संघटीत झाले पाहिजे. शांतीलाल कानडे म्हणाले की, इंग्रज काळात आपण गुलाम होतो, हे मान्य आहे. पण स्वातंत्र्यात सुद्धा आपल्या हक्क अधिकाराची गळचेपी होत आहे, याचे काय? भारताचे संविधानाची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत स्वातंत्र्याची फळे चाखता येणार नाहीत. आपल्या विचारांचे प्रतिनिधी संसदेत पाठविले पाहिजेत. मतदानासाठी एकत्र यावेत म्हणून विचारमंथन झाले पाहिजे. एड. विलास रामटेके म्हणाले की, माणसाला जगण्यासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता असल्यामुळे जीवाचे रान करून,रक्ताचे पाणी केले, हाडाची काडे करून बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य मिळवून घेतले आहे. कर्मकांड आणि ज्ञानकांडात कर्मकांडाचा विजय झाल्यास समाजाचा –हास होऊ शकेल.

प्रमुख वक्ते संघदीप रोडगे म्हणाले की, आपला स्वातंत्र्य लढा महात्मा फुले यांच्यापासून सुरू झाला आहे. माणसाला माणूसपण प्राप्त करून देण्यासाठी लढलेला लढा म्हणजे स्वातंत्र्य लढा होय. संसदेत आपले प्रतिनिधी जाणे आणि आपल्या विचारांचे प्रतिनिधी जाणे यात फरक असल्याने शत्रूच्या सहकार्याने गेलेले प्रतिनिधी आपल्या हक्क अधिकारासाठी ब्र सुद्धा काढत नसतात. नव्हे! तशी त्यांना त्यांच्या मालकाकडून परवानगीच नसते. दूरदृष्टीने राष्ट्रव्यापी चळवळ चालविली पाहिजे. शत्रू आणि मित्र कोण याचा तपासणी केली पाहिजे. आदर्श भिक्खू संघ निर्माण केला पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या सर्व वर्तमान पत्राच्या संपादक व टीमचे आभार व्यक्त करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्यांना ठळक प्रसिद्धी दिली आहे. या देशातील काँग्रेस सारखे पक्ष सुद्धा आमच्या स्वातंत्र्य लढ्याच्या अनुषंगाने कशी भूमिका घेत आहेत? हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या काँग्रेस आणि गांधीने अस्पृश्यांसाठी काय केले? यात स्पष्ट केले आहे. प्रस्थापित व्यवस्थेने अबाधित ठेवलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी संघटीतपणे ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रंस टू पॉलिटिक्स ची अंमलबजावणी केली पाहिजे. त्यांच्या यशस्वीतेसाठी गैर राजनीतिक मुळे मजबूत केली पाहिजेत. समाजातील अनेक शिक्षित, उच्च शिक्षित व्यक्ती या भ्रमात असतात की त्यांना फार काही कळते, जे इतरांना कळत नाही. मात्र कुठल्याही प्रकारच्या समस्यांवर संदर्भासह स्पष्टीकरण विचारले की त्यांची बोबडी वळते आणि निरुत्तर होतात तेव्हाच भ्रमाचा भोपळा फुटतो. परिणामी आडातच नाही तर पोह–यात कुठून येणार ही वास्तविकता समोर येते. म्हणून समाजातील शिक्षित, उच्च शिक्षित, अति उच्च शिक्षितांना सुशिक्षित बनविण्याची प्रक्रिया राबविली पाहिजे. जेणेकरून आपण संघटीत होण्याच्या अनुषंगाने मार्गक्रमण केले पाहिजे. तरच व्यवस्था आपली दखल घेणार मात्र त्यासाठी आपणांस दखलपात्र कार्य करावे लागेल. करिता बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व विधानाची मार्मिकता समजून घेताना वर्तमान परिप्रेक्ष्यातून प्रासंगिकता लक्षात घेऊन मूल्यवर्धित राजकारण स्थापित करण्यासाठी आपण सर्वांनी आपली समर्पक भूमिका पार पाडण्याची नितांत आवश्यकता आहे.

या कार्यशाळेला एड. व्ही. डी. रामटेके, बी. बी. मेश्राम, गोविंद कांबळे, संघदीप रोडगे, प्रा. मंगला झिने, अशोक तायाराम नरवडे, समाधान इंगळे, संघराज धम्मकिर्ती, एस. ए. कानडे, टी. के. हाटकर, आनंद सबरदंडे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# बौद्धजन सहकारी संघाच्या वतीने वर्षावास मालिकेच्या प्रथम पुष्पाचे आयोजन



मुंबई / प्रतिनिधी :– बौद्धजन सहकारी संघ, ता. गुहागर, जिल्हा रत्नागिरी, संलग्न संस्कार कमिटी यांच्या विद्यमाने आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत दर रविवारी वर्षावास प्रवचन मालिका – २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे या प्रवचन मालिकेचे आरंभ तथा प्रथम पुष्प कार्याध्यक्ष दीपक मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि. २८ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ४:०० वाजता बाल क्रीडा मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, नायगाव, दादर (पूर्व), मुंबई –१२ येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रथम पुष्पाप्रसंगी प्रवचनकार बौद्धाचार्य सुगंध कदम गुरुजी हे बौद्ध गाथा व त्यांचा मराठी अनुवाद या विषयांने सदर प्रवचन मालिकेचे प्रथम पुष्प गुंफतील, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस संदेश गमरे व चिटणीस सचिन मोहिते हे करणार असून संस्कार कमिटी अध्यक्ष संदीप गमरे हे स्वागताध्यक्ष म्हणून पाहुण्यांचे स्वागत करणार आहेत. तसेच प्रमुख विश्वस्त संजय पवार, विश्वस्त राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, मुकुंद पवार, के. सी. जाधव, माजी विश्वस्त एस. बी. जाधव, माजी कार्याध्यक्ष संजय जाधव, माजी अध्यक्ष सिद्धार्थ पवार, माजी सरचिटणीस संजय तांबे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तरी सर्व विभाग अधिकारी, विश्वस्त मंडळ, मध्यवर्ती पदाधिकारी, सर्व उपसमित्या त्यांचे पदाधिकारी, सदस्य, महिला मंडळ, उपासक, उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्म प्रचार व प्रसार कार्यास सहकार्य करावे असे आवाहन बौद्धजन सहकारी संघाच्या काढण्यात आलेल्या परिपत्रकात करण्यात आले आहे.

# पीकविमा योजनेतून २०१६ पासून कंपनीने कमविले नऊ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना फक्त गाजरच –खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकरांचा लोकसभेत प्रहार




धाराशिव : – पीकविमा योजना नेमकी कोणासाठी आहे? शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही विमा कपंनीने २०१६ पासून २०२३ पर्यंत नऊ हजार कोटी कमवले पण शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडले नसल्याच वास्तव मांडत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेत सरकारवर प्रहार केला.

यावेळी ओमराजे म्हणाले की, ३० एप्रिल २०२४ चे परीपत्रक तात्काळ रद्द करावे कारण त्या परिपत्रकामुळं शेतकऱ्यांना फटका बसत आहे. निव्वळ महाराष्ट्र राज्याला लागू केलेला निर्णय हा कपंनी धार्जिन आहे असं स्पष्ट मत खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी आज लोकसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शुन्य प्रहार काळात व्यक्त केले.

धाराशिव जिल्ह्यातील ७ लाख ५३ हजार ४६८ शेतकऱ्यांनी पीक विमा भरून पिकाचे संरक्षण केले होते परंतू ५ लाख १९ हजार २७३ पिक विमा मिळणेपासून वंचीत आहेत. तसेच बार्शी तालुक्यातील ८८ हजार ५६० शेतकऱ्यांना २५ टक्के विमा अग्रीम मिळालेला आहे. परंतू ८८ हजार ५६० शेतकरी विम्यापासून वंचीत आहेत. तसेच औसा तालुक्यातील १ लाख २७ हजार ३८१ पैकी ३३ हजार ५०७ वंचीत, निलंगा तालुक्यातील १ लाख ४६ हजार ७१६ शेतकऱ्यांपैकी ४९ हजार १४५ शेतकरी पिक विमा मिळणेपासून वंचीत आहेत. धाराशिव जिल्ह्यात अत्यल्प पावसामुळे, २१ दिवसांच्या पावसाची रक्कम घेतल्यानंतर, इचडीएफसी कपंनीद्वारे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २५४ कोटी रुपयांचे २५ टक्के अग्रीम रक्कम वितरित करण्यात आले. एक हेक्टर पिक संरक्षीत करण्याकरीता शेतकरी राज्य व केंद्र सरकार यांचा मिळून १८ हजार रुपये प्रिमीयम विमा कंपनीस भरावा लागत आहे. १८ हजार रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याबाबतचा धोरणात्मक बदल करण्याबाबत लोकसभेत मागणी करण्यात आली.

सप्टेंबर–ऑक्टोबर–२०२३ मध्ये झालेल्या पावसामुळे पीक विमा कंपनीला आगाऊ माहिती देणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांची संख्या एक लाख ९२ हजार आहे. केंद्र सरकारने ३० एप्रिल २०२४ रोजी अचानक एक परिपत्रक जारी केले. ते शेतकऱ्यांवर अन्याय करणारे असून या परिपत्रकानुसार धाराशिव जिल्ह्यातील ३७ हजार ५७४ शेतकऱ्यांना वैयक्तिक नुकसान भरपाई म्हणून ३९ कोटी ५२ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले. धाराशिव जिल्ह्यातील ५७ महसुली विभागांपैकी फक्त २५ महसूल मंडळांना दिली, तर जिल्ह्यातील ३२ महसुली विभागातील एकाही शेतकऱ्याला वैयक्तिक नुकसानीचा एक रुपयाही मिळाला नाही.

केंद्र शासनाच्या ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकामुळे धाराशिव जिल्ह्यात भरलेल्या पीक विम्यापैकी पाच लाख १९ हजार शेतकरी पीक विमा भरपाईपासून वंचित राहिले आहेत. ३१ ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार धाराशिव जिल्ह्यातील तीन तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले,नंतर राज्य सरकारने २९ नोव्हेंबर २०२३ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार राज्यातील एक हजार २१ महसूल विभाग दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील सर्व महसूल विभागात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आणि ५० टक्क्यांहून अधिक पीक नुकसान स्वीकारले आहे. मात्र केंद्र सरकारच्या परिपत्रकामुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. २६ जून २०२३ च्या शासन निर्णयानुसार धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाई देण्याबाबत कअ्रउ पीक विमा कंपनीला त्यांच्या स्तरावर आदेश करावेत आणि केंद्र सरकारने ३० एप्रिल २०२४रोजी जारी केलेले परिपत्रक रद्द करावे अशी ओमराजे यांनी सभागृहात केली.

३० एप्रिल २०२४ चे परीपत्रक तात्काळ रद्द करण्याची मागणी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी आज लोकसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी शुन्य प्रहार काळात लोकसभेमध्ये केली.

# नवी मुंबईत होणार २४ जुलै ला झोपडपट्टी विकास हक्क परिषद-२०२४ खासदार : नरेश म्हस्के राहणार उपस्थित

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक : १६/०८/२०२४ रोजी नवी मुंबई बेलापूर येथे घर हक्क संघर्ष समिती च्या नेतृत्वाखाली नवी मुंबई व पनवेल विधान सभा मधे येणाऱ्या ५४ हून अधिक झोपडपट्ट्याचे प्रमुख प्रतिनिधीची बैठक संपन्न झाली हया वेळी २४ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता विष्णुदास भावे नाटयग्रुह वाशी नवी मुंबई येथे भव्य झोपडपट्टी विकास हक्क परिषद–२०२४ घेण्याचा निर्णय घेण्यात आला. हया परिषदेला सुमारे दोन हजार हून अधिक झोपडपटटी धारक व. ठाणें जिल्हाचे खासदार नरेश म्हस्के तथा झोपडपटी सुधार समितीचे अध्यक्ष विजय नाहटा हजर राहतील अशी माहिती घर हक्क संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष हिरामण पगार यांनी दिली.
१/हया परिषदेत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात यावी. २०११ पर्यंत चे झोपड्या मग त्या सिडको, कलेक्टर, एम. आई. डी. सी. जागेवर आहेत त्यांचे सर्वेक्षण करुन पुनर्वसन करा.
३/ झोपडपट्टीतील नागरिकांना मूलभूत सुविधा दिल्याचं पाहिजे.
४/सर्वेक्षण होईपर्यंत झोपडपट्टी वरील तोडक कारवाई त्वरीत थांबविण्यात यावी
५/ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींचा संकल्पनुसार सर्व झोपडी धारकांना पक्के घर द्या. हया मागण्या सह अधिक मागण्याचे झोपडी धरकाचे ठराव हया परिषदेत घेण्यात येणार आहे तरी सर्व नवी मुंबईतील व पनवेल मधील झोपडी धारकांनी हया घर हक्क विकास परिषदेला उपस्थित राहावे असे आवाहन घर हक्क संघर्ष समिती चे वतीने करण्यात आले आहे हया सभेला रिपब्लिकन सेनेचे खाजामीया पटेल. घर हक्क संघर्ष समिती नेत्या विनिता ताई बालळेकुंद्री. नेते कैलाश सरकटे. युवा संस्था चे अँड. सुजित निकाळजे सर. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभाग प्रमुख बाळकृष्ण खोपडे, देशमुख, कोडिंबा हिंगोले (कामगार युनियन), कल्याणराव हनवते (बहुजन प्रेरणा सामाजिक संस्था) इत्यादी कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने झोपडी धारक उपस्थित होते.

# बोगस गृहनिर्माण संस्था काढून ३२३ सभासदांकडून कोट्यवधी रुपयांची लूट

करणाऱ्याविरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर फसवणूक झालेल्या सभासदांचे उपोषण




लातूर – लातूर येथे श्री कन्यका परमेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्था या नावाने बोगस संस्थेच्या नावाखाली लातूर तालुक्यातील मुरुड अकोला, चाटा, भोयरा, हरंगुळ, आक्करवाई आदी गाव शिवारात संस्थेच्या नावाने कोणताही अकृषी व लेआऊट मंजूर नसताना ३२३ सभासदांकडून लाखों रुपये घेवून बनावट पावत्या व प्लॉट हस्तांतरण प्रमाणपत्र देवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या तथाकथित संस्थेचे हरिश्चंद्र कोटलवार, श्रीरामचंद्र देवशेटवार, तुकाराम कोटगिरे, विकास पारशेवार, माणिक बटटेवार व इतर पदाधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांना अटक करावी. तसेच या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी आज २२ जुलै रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत या प्रकरणात फसवल्या गेलेल्या शेकडो सभासदानी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करून जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे यांना निवेदन देण्यात आले. दरम्यान राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे हे जिल्हाधिकारी कार्यालयात आलेले असताना त्यांची गाडी थांबवून उपोषणकर्त्यांनी त्यांच्याजवळ आपले गाऱ्हाणे मांडले. या संदर्भात चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यासाठी प्रयत्न करीत असे त्यांनी यावेळी आश्वासन दिले. या उपोषण आंदोलनात संगमनाथ मद्रेवार, जनार्दन चन्नावार, विद्यासागर गुट्टेवार, रमाकांत रायेवार, नंदकुमार चिंतलवार, लक्ष्मीकांत चिद्रेवार, रामकिशन मद्रेवार, उमाकांत गादेवार, अरुणए पेन्सलवार, राजकुमार मुत्तेवार, गजानन चिद्रेवार, अनेलि चिद्रेवार, दत्ता चिद्रेवार, सुवर्णा गबाळे, अंबर राधाकिसन, अनिल बनभेरू, शरद पोलावार, माधव वट्टमवार, सागर रायेवार , दिपक पेन्सलवार, राजेश्वर पेन्सलवार, बालाजी देबडवार, सुजित चिगळे, राम वटमवार आदींसह शेकडो सभासद उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ नवी मुंबई तर्फे आषाढी एकादशी निमित्त फराळ वाटप



नवी मुंबई / के.एच. हनवते :– आषाढी एकादशीचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत नेहमीच समाजाच्या हितासाठी अग्रेसर असणारी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या माध्यमातून प्रमुख संघटक संजय भोकरे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या आदेशाने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ नवी मुंबई संघटनेच्या माध्यमातून दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात त्यामध्ये गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप पत्रकारांना हेल्मेट वाटप पत्रकार दिनानिमित्त पत्रकार व विशेष समाजकार्य केलेला सामाजिक संघटना व समाजसेवकांना विशेष सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करणे आरोग्य शिबिर असे अनेक सामाजिक उद्दिष्टे संघटनेच्या माध्यमातून राबवली जातात व नवी मुंबईतील सर्वसामान्य घटकांना माध्यमांच्या द्वारे व संघटनेच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्याचे काम या संघटनेच्या माध्यमातून केले जाते याच उद्देशाने नवी मुंबई संघटनेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त कोपरखैरणे पोलीस स्टेशन येथे जाऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या सहकार्याने पोलीस स्टेशनमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना फराळाचे वाटप केले यावेळी उपस्थित येणारे पोलीस स्टेशनचे सीनियर सतीश कदम हे उपस्थित होते यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी संघटनेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत असे सामाजिक बांधिलकी पत्रकार बांधवांनी ठेवावी व समाजाच्या हितासाठी आपली पत्रकारिता आपण करावी कोपरखैरण्यामध्ये शांतता राखण्यासाठीही सर्व पत्रकार बंधूंनी सहकार्य करावे असे संघटनेच्या माध्यमातून सर्व पत्रकारांना यावेळेस संबोधित केले त्यानंतर कोपरखैरणे सेक्टर १५ ते १८ अण्णासाहेब पाटील मैदान येथे विठ्ठल मंदिरामध्ये वारकरी भाविक भक्तांना फराळाचे वाटप करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास भिंगारदिवे वाहतूक कोपरखैरणे विभाग व पोलीस कर्मचारी आणि माजी नगरसेवक रविकांत पाटील माजी नगरसेविका भारती पाटील समाजसेवक विठ्ठल मोरे पोलीस मित्र मंडळाचे नवी मुंबई अध्यक्ष रवींद्र वाळुंज जनतेचा सावधान महाराष्ट्र वृत्तपत्राचे सहसंपदा अरून बिराजदार व कार्यक्रमा साठी वाशी समाचार वृत्तपत्राचे मुख्य संपादक सुनील तावडे विशेष सहकार्य केले आयोजक महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ कोकण विभागीय कार्याध्यक्ष राजेंद्र बोडके व नवी मुंबई संघटनेचे सचिव प्रवीण हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला यावेळी यावेळी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपाध्यक्ष दिनकर गायकर खजिनदार राजू भाई मीर सह खजिनदार धनंजय कुरकुटे माजी सचिव अशोक लांडगे सदस्य सांगळे सर, जनतेचा सावधान महाराष्ट्र प्रतिनिधी साईनाथ शिंगोटे,लक्ष्मीण पार्टे,आनंद पारठे, मयूर आरोटे हक्काचा आवाज चे प्रतिनिधी अशोक पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये कार्यक्रम पार पडला

# गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी नऊ दिवस शिल्लक भुखंड नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याचे मनपाचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी :शहर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत व हस्तांतरित झालेले भूखंड विकास नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यास दि.१ ते ३१ जुलै २०२४पर्यंत नव्याने संधी देण्यात आली आहे.संबंधितांनी याची दखल घेत मुदतीत प्रस्ताव दाखल करावेत,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाचे परिपत्रक क्र.अनबां–१०२०/४८०/प्र.क्र/७९/ २०००/भाग–२० दि.०५/०५/२००१ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक १२ मार्च २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण )अधिनियम २००१ यांच्या कलम ३ मधील पोट– कलम १ मध्ये १ जानेवारी २००१ रोजी या मजकुराऐवजी ३१ डिसेंबर २०२० च्या व गुंठेवारी अधिनियमातील कलम ४(१) या प्रमाणे ठराव क्र.२०२ दि.०१/०७/२०२४ नुसार गुंठेवारी चालु करण्यासाठी ३१ जुलै २०२४ पर्यंत संधी देण्यात आली आहे.

महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण ) सुधारीत अधिनियम २०२१ व तसेच लातूर शहर हद्दीतील सद्यस्थितीत मंजूर विकास योजना (सु+वा.क्षे.) प्रमाणे अनाधिकृत भूखंड / हस्तांरित झालेले भुखंड व गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी नागरिकांनी ३१ जुलै २०२४ पर्यंत प्रस्ताव दाखल करून घेवून नियमीत करावेत असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पत्रकार माझा सहकारी हि योजना महाराष्ट्र राज्य शासनाने सुरू करावी



नवी मुंबई / के. एच. हनवते :– वाशी समाचार वृत्तपत्राचा द्वितीय वर्धापनदिन सोहळा द पार्क हॉटेल सिबीडी बेलापूर नवी मुंबई येथे उत्साहात पार पडला त्यावेळी वरील उदगार उपस्थित पत्रकार यांनी काढले जसे की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण हि योजना महाराष्ट्र शासनाने सुरू केली तशीच योजना पत्रकार माझा सहकारी म्हणून ही पण योजना सुरू करावी. त्यावेळी या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे : श्री. सुनील पवार ( अतिरिक्त आयुक्त नवी मुंबई महानगर पालीका ), श्री पंकज डहाणे ( उपायुक्त परि .१ नवी मुंबई पोलीस ), श्री तिरूपती काकडे ( उपायुक्त वाहतुक नवी मुंबई पोलीस ), व्ही के नायर, गणेश मुळे, सुरेंद्र निकम इत्यादी मान्यवरांच्या शुभ हस्ते नवी मुंबईतील आनेक पत्रकारांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात अला. त्यात स्वाभिमानी व निर्भिड पत्रकार म्हणुन कल्याणराव हनवते यांचा जाहीर सत्कार करण्यात अला. तसेच नुकताच महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार : आयु. उत्तमराव तरकसे यांना मिळाला त्यांचा पण या कार्यक्रमात जाहीर सत्कार करून सन्मानित करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन : सुनील तावडे (वाशी संपादक) यांनी केले होते तर या कार्यक्रमाचे भारदस्त सूत्रसंचालन पत्रकार : राजेंद्र बोडके यांनी केले.

# दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते पोस्टरचे विमोचन




लातूर– दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा लोकशाहीच्या बळकटीसाठी,पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी दिनांक २८ जुलै ते १ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न होणार आहे. या यात्रेच्या पोस्टरचे विमोचन करताना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे दिसत असून सोबत लातूर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक देडे, शहराध्यक्ष महादेव डोंबे व पत्रकार वाल्मीक केंद्रे सह अन्य पदाधिकारी दिसत आहेत.

भारतीय लोकशाहीचा पत्रकारिता चौथा स्तंभ मानला जातो राज्यकर्त्या सरकारी व्यवस्थेवर अंकुश आणि समाज जनजागृतीचे व्यापक काम ओळखपत्रांच्या माध्यमातून अविरतपणे केले जाते आकाशाला भिडणारी महागाई समाज माध्यमांचा वाढता प्रभाव यामुळे जाहिरातीचे प्रमाण कमी झाल्याने वृत्तपत्र व्यवसाय आणि त्यावर अवलंबित असणारे पत्रकार आर्थिक व्यवस्थेत आले आहेत कोरोना वैश्विक महामारी महाराष्ट्रात १५० पेक्षा जास्त पत्रकारांचा जीव गमावला गेला आहे पण लो घोषणा करूनही सरकारने मदत केली नाही अनेक ओळखपत्रांची आवृत्ती बंद करून शेकडो पत्रकार व कर्मचाऱ्यावर अन्याय झाला उर्वरितांचा अल्प वेतनावर काम करावे लागले आहे आर्थिक अडचणीत सापडलेल्या काही पत्रकारांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटनाही घडल्या मात्र समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांचे दुःख कोणी समजून घेत नाही हे भयान वास्तव्य आहे निश्चयने आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पत्रकारांनाही काही प्रश्न समस्या असतात यावर विचार होत नाही गेल्या दहा वर्षात इंधनाचे दर पेट्रोल ६० रुपयावरून ११० रुपयापर्यंत डिझेल पन्नास रुपया वरून १०० पर्यंत वाढलेले आहेत एक कप चहा दोन रुपये वरून दहा रुपयापर्यंत पोहोचला गेला आहे इतरही दैनंदिन लागणाऱ्या सर्वच वस्तूंच्या किमती जवळपास चार पटीने वाढल्या मात्र दररोज चहापोवन स्वस्तात देणाऱ्या पारंपरिक आर्थिक धोरणामुळे १२ पाणी वृत्तपत्राची विक्री किंमत पाच रुपये पर्यंतच आहे उत्पादन खर्चाच्या तुलनेत केवळ ३० टक्के विक्री किंमत असणारे हे जगातील एकमेव असे उत्पादन आहे उत्पादन खर्च जास्त आणि विक्री कमी किमतीत त्यामुळे वृत्तपत्र व्यवसाय आणि काम करणाऱ्या पत्रकारांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे ग्रामीण भागातील पत्रकारांना इतर नाममात्र मानधनावरच काम करावे लागते. महाराष्ट्र शासनाने पत्रकारांसाठी काही योजना सुरू केल्या मात्र जागतिक अटीमुळे पात्र पत्रकारांना या योजनेचा लाभ होत नाही एक दशकांच्या लढ्यानंतर पत्रकार हल्ला कृती विरोधी संरक्षण कायदा मंजूर झाला मात्र त्याची स्थानिक पातळीवर अंमलबजावणी होत नाही तर बाळशास्त्राचा आंबेकर सन्मान पेन्शन योजना सुरू केली त्यातील काही अटीमुळे जस्ट पत्रकारांना लाभ होत नाही दीड वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला तरी पूजेच्या बाबतीत बैठकच होत नसल्याने अनेक जज पत्रकार निवृत्त वेतन मिळण्याच्या प्रतीक्षेतच मृत्युमुखी पडले आहे सरकारी वृत्तपत्र प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीवर छपाईच्या कागदावर जीएसटी कर लावला मात्र शासकीय जातीचे दर त्या तुलनेत वाढवले नाही परिणामी खर्च आणि उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण झाल्याने विभाग जिल्हा व तालुका पातळीवरील अनेक छोटी वर्तमानपत्र बंद पडत आहेत पण आम्ही लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणसाचा आवाज कमजोर होण्याची भीती निर्माण झाली आहे स्थानिक व्यवस्थेला प्रश्न विचारणारे सामान्य माणसाच्या समस्या मांडणारी छोटी वृत्तपत्र व्यवस्था पहा ही चिखली पाहिजे काही हजार कोटी रुपयांच्या वृत्तपत्र व्यवसायावर पत्रकाराबरोबरच अनेकांचा रोजगार अवलंबून आहे महाराष्ट्रात ५० हजारापेक्षा जास्त संख्या असलेल्या पत्रकार घटकांचे प्रश्न कोणी मांडत नाही मात्र समाजाचे प्रस्थापित व्यवस्था स्थानिक प्रशासन यांच्याविरुद्ध पत्रकाराने संघर्ष करावा अशी अपेक्षा ठेवली जाते अशा परिस्थितीत पत्रकारांच्या न्यायासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने सातत्याने लढा दिला आहे केंद्र आणि राज्य सरकारकडे मागण्या करून पाठपुरावा सुरू केला आहे रजातील सर्वाधिक ३०००० सदस्य संख्या असलेल्या संघटनेचा जिल्हा शहर गाव पातळीवर प्रभाव मोठा आहे प्रसार माध्यमात काम करणाऱ्या पत्रकार व कर्मचाऱ्यांचा एक घटक म्हणून प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे यासाठी समाजातील विविध घटकांनी पाठिमा द्यावा अशी अपेक्षा आहे राज्यकर्ते मतपेटीचा विचार करूनच कोणत्याही घटकाचे प्रश्न सोडवण्यासाठी मानसिकता ठेव असतील तर पत्रकाराने न्यायासाठी राजकीय विचार करावा का राज्यकर्त्यांनी पत्रकारांच्या मागण्याबाबत सगळा भूमिका घ्यावी यासाठी संवाद यात्रेच्या माध्यमातून पत्रकार चे प्रश्न केंद्रस्थानी यावेत ही अपेक्षा धरून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा नागपूर येथील दीक्षाभूमी ते मंत्रालय निघणार असून यामध्ये राज्यातील सर्व विभागीय अध्यक्ष कप जिल्हा अध्यक्ष तालुका अध्यक्ष व सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सहभाग घ्यावा असेही राजे सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांनी आव्हान केले आहे.


# आमदार धिरज देशमुख यांच्याकडून लहाने कुटुंबीयांचे सांत्वन



लातूर/प्रतिनिधी नेत्रतज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने यांच्या मातोश्री अंजनाबाई पुंडलिकराव लहाने यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या माकेगाव (ता. रेणापूर) या गावी जावून आमदार धिरज विलासरावजी देशमुख यांनी शनिवारी लहाने कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी नेत्रतज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने, बापुदेव महाराज, माजी आमदार त्र्यंबक भिसे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, लातूर जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, अनंतराव देशमुख, अनुप शेळके, प्रभाकर केंद्रे, रमेश सूर्यवंशी, हणमंत पवार, तुषार लहाने, रमेश मुंडे, प्रा बाबाराव शेप, नरहरी लहाने, नाथराव केंद्रे, विठ्ठल कांबळे, वालचंद मुंडे, बाबुराव नागरगोजे, बाळासाहेब करमुडे आदी उपस्थित होते.

# किनवट येथे मोकाट जनावरे व बेशिस्त वाहनांमुळे वाहतुकीची कोंडी

किनवट/शेख शौकत :–किनवट शहरातील जुन्या नगर परिषदेचे प्रांगण आणि समोरच्या रस्त्यावर नेहमीच मोकाट गुरं, गाढवांचा आखाडा तर आहेच शिवाय गाड्या पार्कींगची व्यवस्था नसल्यामुळे दुकानांसमोर रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी गाड्या लावल्यामुळे रस्त्यावर लोकांची कोंडी होत आहे. तहसिल चौकातही यापेक्षा भयावह स्थिती आहे. नगर परिषद आणि पोलीस प्रशासनाने यावर तोडगा काढून वाहनांची कोंडी होणार नाही अशी कार्यवाही करावी, अशी त्रस्त झालेल्या नागरीकांची मागणी आहे. शहराच्या मध्यभागी व्यापारपेठेतील छ. शिवाजी महाराज पुतळा चौक, स्टेट बँक ऑफ इंडिया, पोस्ट ऑफीस, बसस्थानक परिसर, अशोकस्तंभ, तहसिलचौक अशा लोकवर्दळीच्या ठिकाणीच नेमका ज्यांना वाली नाही अशी मोकाट जनावरे आणि ज्यांना वाली असूनही लावारीश सोडलेल्या गाढवांचा आखाडा आहे. आता या जनावरांपासून प्रत्येकांना त्रास सहन करावा लागतो. यांना थांबण्याची नगर परिषदेने व्यवस्था करायला हवी. शिवाय त्यांच्या चारापाण्याची सोय केल्यास त्यांचा रस्त्यावरचा थांबा कमी होईल. त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था नसल्यामुळे कदाचित ते मार्केटमधिल रस्त्यावर प्लास्टीक पिशव्या, कागदं, कचरा खाण्यासाठी रस्त्यावर गर्दी करतात. रस्त्यात जनावरांचा



रहावा आणि त्यातच अधिकची भर म्हणून रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांच्या समोर दुकानदारांच्या सामानाचे अतिक्रमन आणि वाहनांना पार्कींगची व्यवस्था नसल्याने दुकानांसमोरच वाहनांच्या रांगा. त्यामुळे दोन ऑटोरिक्षे जातील एवढाही रस्ता नसतो. वाहनांची कोंडी होते. लोकांना पायी सुद्धा चालतांना तारेवरची कसरत करावी लागते. याचा कोणी वाली आहे की नाही? असा सवाल उठणे स्वाभाविक आहे. प्रभारी प्रशासक मुख्याधिकारी मुगाजी काकडेंनी परवाच अतिक्रमन हटवलेल्या चौकात पुन्हा दररोज दुपारनंतर ढकलगाड्यांच्या रांगा लावल्या जात आहेत. त्या गाड्यावाल्यांना प्रशासनाने जागा निश्चीत करुन दिल्यास रस्त्यावर अतिक्रमन होणार नाही. पुन्हा कोणी अतिक्रमन करीत असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जावी, असा सूर ऐकायला मिळतो.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE